# बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि. २१ जून २०२२

### जेलरोड पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३०५/२०२२ भादंविसक ३५३,३३२,२७९,४२७ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २१/०६/२०२२ रोजी ०७.१० वा चे सुमारास, जुना बोरामणी नाका साऊथ एशियन ट्रान्सपोर्टच्या समोर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २१/०६/२०२२ रोजी १६.०७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | पोहेकॉ/ ११३० पृथ्वीराज चंद्रकांत फुटाणे, नेम- शहर वाहतुक शाखा उत्तर, सोलापूर शहर |
| **आरोपीचे नाव** | : | ट्रक क्रं. एम एच १३ सी टी ००७७ चालक भैरवनाथ सोमनाथ झेंडगे, रा. भांबेवाडी, ता. माहोळ, जि. सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, यातील फिर्यादी हे मार्केट यार्ड येथे कर्तव्यावर असताना ट्रक क्रं. एम एच १३ सी टी ००७७ हे वाहन पुणे रोडवरुन शहर हद्दीत येत असल्याचे फिर्यादी यांनी पाहिले व त्यास थांबण्याचा इशारा केला परंतु तो थांबला नाही व तो ट्रक जुना बोरामणी नाका चे दिशेने गेला त्यामुळे फिर्यादी हे पोकॉ पंडागळे यांना सांगितले की सध्या सोलापूर शहरात शाळा सुरु असून सोलापूर शहरात गेलेला ट्रक परत वळवून आणतो असे सांगुन फिर्यादी हे फिर्यादीची मोटार सायकल क्रं. एम एच १३ सी एल ३३७८ वरुन जुना बोरामणी नाका येथे जाईपर्यंत सदरचा ट्रक पुढे गेला होता. म्हणून फिर्यादी सदर ट्रक थांबविण्याकरीता पुढे शांती चौकाचे दिशेने गेले व ट्रक गाडी थांबव, गाडी बाजुला घे, सोलापूर शहरात सध्या नो एन्ट्री आहे असे जोरजोरात ओरडुन सांगत असताना देखील चालक त्याची ट्रक पुढे घेवून जात असताना फिर्यादी वरील ठिकाणी गाडी चालवत ट्रक चालकाला गाडी थांबविण्याचा इशारा देत असताना ट्रक चालकाने त्याकडे दुर्लक्ष करुन, जाणीवपुर्वक निष्काळजीपणाने फिर्यादीच्या गाडीस उजव्या बाजुस पाठीमागून जाणून बुजून जोरात धडक देवून फिर्यादीस गाडीसकट जमिनीवर खाली पाडले. त्यामुळे फिर्यादीच्या गाडीचे उजव्या बाजुचे पाठीमागील लाईट फुटली व गाडीच्या डावया बाजुचा पत्रा चेमटला त्यामुळे फिर्यादीच्या गाडीचे अंदाजे ४,०००/- रु चे नुकसान करुन फिर्यादीस जोरात धडक देवून फिर्यादी जमिनीवर पडल्याने फिर्यादीच्या गुडघ्यास व गुडघ्याचे खाली मुक्का मार लागुन खरचटले आहे व फिर्यादीचे दोन्ही हात जमीनीवर आपटल्याने फिर्यादीच्या हातास मुक्का मार लागला आहे. तरी यातील वरील आरोपीताने फिर्यादी करीत असलेल्या शासकीय कामात अडथळा निर्माण करुन , फिर्यादीच्या मोटार सायकलला निष्काळजीपणाने जाणीवपुर्वक मागुन धडक देवून गाडीचे नुकसान केले व फिर्यादीस जखमी करण्यास कारणीभुत झाला आहे. तसचे फिर्यादीच्या अंगावर धावुन येवून फिर्यादीच्या शासकीय कामात अडथळा निर्माण करुन फिर्यादीस शासकीय कामापासुन परावृत्त केले आहे म्हणून. तपास:- सपोनि/ चिंताकिंदी - ९४२१८६६३०२ |

### विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३१३/२०२२ भादंविसक २७९,३३८, मोवाकाक १८४/१७७ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. १९/०६/२०२२ रोजी १७.३० वा चे सुमारास, हत्तुर गाव ते समशापुर या गावाच्या दरम्यान, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि. २१/०६/२०२२ रोजी १७.५३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | ज्ञानेश्वर रतन पाटील, वय- ६५ वर्षे, रा. मु. समशापुर, पो. हत्तुर, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर, सध्या- वाघचवरे हॉस्पीटल, डी. मार्ट रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | माल ट्रक क्रं. टी एन ५२ पी ८७४१ चा चालक |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे वरील ठिकाणी थांबले असताना, फिर्यादीचे समोरुन वरील आरोपीत वाहन चालकाने कोणत्याही प्रकारचे हॉर्न न |

| | | |
|---|---|---|
| | | वाजवता फिर्यादीच्या समोर येवून, फिर्यादीस जोरात धडक दिल्याने फिर्यादीस डाव्या पायास गंभीर दुखापत होणेस कारणीभुत झाला आहे म्हणून फिर्यादीची वरील आरोपीत वाहन चालकाविरुध्द तक्रार आहे . तपासः- पोना/ १२०१ जाधव |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ३१२/२०२२ भादंविसक २७९,३३८, मोवाकाक १३४(अ)(ब),१८४/१७७ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. १९/०६/२०२२ रोजी १९.३० वा चे सुमारास, हत्तुर गावाच्या पुढे, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि. २१/०६/२०२२ रोजी १७.१३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | सिध्दाराम दुंडाप्पा बगले, वय- ५० वर्षे, व्यवसाय- नोकरी, रा. मु.पो. माळकोटे, ता. द. सोलापूर, जि. सोलापूर सध्या- धांडोरे हॉस्पीटल, विजापूर रोड, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | बुलेट मोटार सायकल क्रं. एम एच १३ डी डी ७७९६ चा चालक |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व फिर्यादीचा मित्र संजय बिराजदार असे फिर्यादीचे मोटार सायकल क्रं एम एच १३ सी ई ७२५२ या वरुन जात असताना, समोरुन एक बुलेट वाहन क्रं. एम एच १३ डी डी ७७९६ चे चालकाने रॉंगसाईड ने येवून त्याचे ताब्यातील वाहन निष्काळजीपणे चालवुन, जोरात धडक देवून फिर्यादी व फिर्यादीचे मित्र असे दोघांना गंभीर दुखापत करुन पळुन गेला आहे म्हणून फिर्यादीची वरील आरोपीत वाहन चालकाविरुध्द तक्रार आहे. तपासः- पोना/ १२०१ जाधव |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | ३३६/२०२२ भादंविसक ३८० प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. २०/०६/२०२२ रोजी १५.०० वा चे सुमारास, फिर्यादीचे राहते घरी, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि. २१/०६/२०२२ रोजी १५.३३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | शुभम श्रीनिवास बोलाबत्तीन, वय- २७ वर्षे, व्यवसाय- इंजिनियर, रा. ९४/१८, चौडेश्वरी पतपेढीच्या समोर, जोडभावी पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | **:** | ४०,०००/- रु एक काळया रंगाचा डेल कंपनीचा लॅपटॉप |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे राहते घरी हॉल मध्ये लॅपटॉपवर काम करत होते. काम संपल्यावर फिर्यादीने लॅपटॉप घ्राच्या हॉलमधील टेबलावर ठेवून घरात जेवण करायला किचनमध्ये गेले होते. त्यावेळी घराचा दरवाजा उघडा होता व फिर्यादी व फिर्यादीची आई असे जेवण करुन हॉलमध्ये आले असताना टेबलावर ठेवलेला लॅपटॉप दिसून आला नाही, आजुबाजुस शोध घेतला असता मिळून आला नाही. तरी कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे उघडया दरवाज्यातुन घरात प्रवेश करुन हॉलमधील टेबल वरील फिर्यादीचा वरील वर्णनाचा लॅपटॉप फिर्यादीचे संमतीवाचनून, मुद्दाम लबाडीने चोरुन नेला आहे म्हणून. तपासः- पोना/ १४६३ घोळवे |